आंतरमहाविद्यालयीन लघुअंतर धावण्याच्या स्पर्धेतील सहभागी महीला खेळाडुच्या व्यक्तीमत्व,आत्मविश्वास व निवासी परिसर यांचा क्रिडा कार्यमानावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास

स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

(शारीरिक शिक्षण) पी.एच.डी.पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा मान्यतेस्तव सादर

संशोधक

लोपामुद्रा दत्तराव आनेराव

मार्गदर्शक

डॉ. अश्विन बोरीकर,

क्रिडा विभाग प्रमुख,सायन्स कॉलेज नांदेड

सादर स्थळ

स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

२०१९-२०२०

प्रकरण -०१

1.1 प्रस्तावना :

"वाळुचे कण रगडीता तेल ही गळे या म्हणी प्रमाणे "

भारत देशात व परदेशात मोठया पदावर कामकरणाऱ्या महीलांना अनेक संकटांना आणि संघर्षांना तोंड घ्यावे लागते. तरी आपले सर्व श्रेष्ठत्व दाखवतात.महीलांना तर सामाजिक कार्य, शिक्षण क्षेत्र व क्रिडा क्षेत्रात काम करणाऱ्या महीलांना वैयक्तिक आणि सामाजिक पातळीवर संघर्ष करुन आपले यशाचे शिखर गाठावे लागत आहे.

महिलांनी फक्त कुटूंबापुरतेच मर्यादीत राहणे **" चुल व मुल "** अशी समजुत अनेक वर्षापासुन भारत देशात होती व आजही काही ठिकाणी तशी समजुत आहे.आज अनेक ठिकाणी राजकराण व प्रशासन हे महीलांना जमणार नाही.तसेच **"आमच्या कुटूंबात असे चालणार नाही "**असे म्हणणारे लोक अजुन आहेत.

पण या सर्वांना न जुमानता व मोठया धाडसाने संकटाला न डगमगता अनेक महिलांनी आपल्या कार्याचा इतिहास हा सुवर्णाक्षरांनी लिहीला आहे.त्यात राजमाता जिजाबाई,कस्तुरबा गांधी कल्पना दत्त, विणा दास,सरोजिनी नायडु , झांशीची राणी लक्ष्मीबाई,सावित्री बाई फुले ,मदर टेरेसा,किरण बेदी,कल्पना चावला,सुनिता विल्यम्स ,आनंदीबाई जोशी,लता मंगेशकर ,आशा भोसले, इंदीरागांधी,प्रतिभाताई पाटील,पिटी उषा, बच्छेंद्री पॉल,कर्णम मलेश्वरी,अंजु बॉबी जॉर्ज, सानिया मिर्झा,हिमा दास अशा अनेक महीला आहेत.त्यांनी समाजाला न जुमानता यशाचे शिखर गाठले आहे.

1. **पी.टी.उषा :-**

धावपट्टु सर्वोत्कृष्ट चमकणारा तार,पायोली एक्सप्रेस ॲथलिटीक्स भारताची सुवर्ण कन्या म्हणुन ओळखले जाते.राष्ट्रीय व आंरराष्ट्रीय क्रिडा स्पर्धामध्ये पी.टी.उषा यांनी भारताचे नाव उज्वल केले व 24 व्या ऑलिम्पिक स्पर्धामध्ये 4 सुवर्णपदके आणिक 1 रौप्य पदक मिळुन भारत देशाचे नाव सर्व जगात उंचावले आह.

2. **बच्छेद्री पाल :-**

1994 साली माऊंट एव्हरेस्ट शिखरावर प्रथम पाऊल ठेवणारी श्रेष्ठ महीला म्हणुन बच्छेंद्री पाल यांचे नाव घेतले जाते.गिर्यारोहकामध्ये सर्वाधिक पुरस्कार प्राप्त करणारी श्रेष्ठ महीला म्हणुन ओळखले जाते.भारतातील सर्व पर्वतांवर गिर्यारोहक केले आहे.1993 मध्ये भारत नेपाळ महीला माऊंट एव्हरेस्ट अभियानांचे नेतृत्व त्यांनी केले .ज्यात 7 विश्व रेकॉर्डची त्यांना नोंद केली आहे.

3. **अंजु बॉबी जॉर्ज :-**

"भारतीय ताराका" म्हणुन अंजु बॉबी जॉर्ज यांना ओळखले जाते.जागतीक ॲथलेटिक्स खेळात कास्य आणि जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पीयन स्पर्धेत पॅरीस येथे कास्यपदक मिळाले.2004 पर्यंत अंजु जागतिक पातळीवर चॉथ्या नंबरची ॲथलॅटींक्स बनली.

4. **हिमा रणजित दास:-**

हिमा दास यांना ढिंग एक्सप्रेस,उड्डाणपरी ,प्लाईंग राणी इत्यादी नावने ओळखले जाते.केवळ दोन वर्षापुर्वी रेसींग ट्रॅकवर उतरलेल्या हेमा दासने भारतासाठी अवघ्या 20 दिवसाच जागतिक पातळीवर 6 सुवर्ण् पदक मिळविले व जागतीक स्तरावर अशा स्पर्धेत मिळवणारी ती पहीली भारतीय ॲथलिट आहे.आज देशाची ती सुवर्ण कन्या ठरली आहे.ती एका शेतकरी कुटूंबातील मुलगी आहे.मात्र तीच्या

आत्मविश्वास व व्यक्तीत्वाच्या धाडसाने भारत देशाचे नाव केलेच पण तिच्या गावातील आणि आसपासच्या गावामध्ये दारुबंदी केली.

प्राचिन ऑलिम्पीक स्पर्धा 776 इ.स.पुर्व सुरु असाव्यात असे काहींचे मत आहे व काहींचे मत त्यापुर्वी 500 वर्षापासुन ऑलिम्पीक स्पर्धा सुरु असाव्यात असे म्हंटले आहे.कालांतराने अर्वाचीन ऑलिम्पीक स्पर्धा फ्रेंच,बॅरन डी कुबर्टीनने 1896 साली अथेन्स या ठिकाणी भरविल्यात आल्या. प्राचिन काळी स्त्रीयांना ऑलिम्पीक स्पर्धत भाग घेण्याची परवानगी नव्हती व स्पर्धा पाहण्यासही परवनगी नव्हती.हा नियम मोडणाऱ्या स्त्रीयांना मृत्यु दंडाची शिक्षा दिली जाईल.नंतर रोम सम्राटाने हि अट बाजुला सावरुन स्त्रीयांना परवानगी दिली .प्रत्येक्षात सन 1904 च्या ऑलिम्पीक मध्ये प्रथम महीलांना प्रवेश देण्यात आला आहे.सन 1968 च्या ऑलिम्पीक पासुन स्त्री खेळाडुंनाही ऑलिम्पीक ज्योत पेठविण्याचा मान मिळाला.आज भारतातच नाहीतर संपुर्ण जग भरात महीला हया पुरुषांचे बरोबरीने खेळाचे प्रशिक्षण घेत आहेत. तसेच व्यायाम करीत आहेत व आपले ध्येय साध्य करीत आहेत.

आधुनिक काळात मुला मुलींचा सर्वागिन विकास होवा म्हणुन शाळेमध्ये शारीरीक शिक्षणाचा अभ्यास राबवीला जातो.आपणास असे दिसुन येते की,सर्वांगिन विकासात शारीरीक,मानसिक, भावनिक, सामाजिक विकास यांचा अंर्तभाव असतो.आपण पाहतो सध्याच्या युगात शारीरीक क्षमतांचा विकास करण्यासाठी अनेक ठिकाणी संशोधन केली जात आहे व प्रयोग केली जात आहेत.

'व्यायाम 'हा सध्याच्या युगात शारीरीक शिक्षणाच्या अभ्यास क्रमातील एक अविभाज्य घटक आहे.नियमीत व्यायामामुळे आपण स्पर्धेत विजय मिळवु शकतो.विजय मिळवण्यासाठी आपल्याला आतोनात प्रयत्न करावे लागतात.तसेच

खेळात विजय प्राप्त करण्यासाठी व्यक्तीमत्व,आत्मविश्वास,तसेच आपण राहत असलेला निवास परिसर हे पण तेवठेच कारणीभुत ठरतात.

महीला खेळाडुंना खुप महेनत घेवुनही अनेक वेळेस अपयश येते महील्यांच्या शरीराची ठेवण,आखुड बांधा,पुरुषांच्या तुलनेत कमी उंची ,मात्रत्व, वेशभुषा,त्याच प्रमाणे व्यक्तीमत्व ,आत्मविश्वास, निवासपरीसर अशा अनेक कारणांचा विजय प्राप्तीवर परिणाम करतो.त्यावरुन व्यक्तीमहत्व,आत्मविश्वास,निवासपरीसर यांचा आंतर महाविद्यालयीन लघु अंतर धावण्याच्या महीला क्रिडा कार्यमानावर काय परिणाम होतो ? असा प्रश्न संशोधिकेच्या मनात आला म्हणुन संशोधिकेने संशोधनासाठी हा विषय निवडला आहे.

शारीरीक शिक्षण व मैदानी क्रिडा क्षेत्रात अनेक प्रकारचे संशोधन झालेले आहे.संशोधिका गेली 10 वर्षे शारीरीक शिक्षण क्षेत्रात असल्यामुळे संशोशिकेला असे लक्षात आले की,आंतर महाविद्यालयीन लघु अंतर धावण्याच्या स्पर्धतील सहभागी महीला खेळाडुच्या व्यक्तीमहत्व,आत्मविश्वास व निवास परिसर यांचा क्रिडा कार्यमानावर होणाऱ्या परिणामा तुलनात्मक अभ्यास जानुन घेण्यासाठी संशोधिकेने हा विषय निवडला आहे.

1.2 संशोधन समस्याचे स्पष्टीकरण :

आज भारतामध्ये पाहीलेतर काही खेळामध्ये मोठया प्रमाणात प्रगती करत असल्याचे आढळुन येते.मात्र त्या तुलनेत इतर काही खेळामध्ये प्रगती अतिशय खालावलेली असल्याची दिसते याचे अनेक कारणे असु शकतात.जसे आधुनिक तंत्र व यंत्राची कमतरता,शासनाने क्रिडा विषयक धोरण,आर्थिक धोरण,सामाजिक धोरण त्याच प्रमाणे कोणत्याही खेळामध्ये खेळाडुंचे कार्यमान उंचविण्यासाठी योग्य प्रशिक्षणाचे व शास्त्रीय दृष्टीकोणाचा अभाव.तसेच तंत्र वैज्ञाणिक प्रशिक्षण व

आधुनिक व्यायाम प्रकार,त्याच प्रमाणे खेळाडुंचे व्यक्तीमत्व,आत्मविश्वास व निवास परिसर हे घटक खेळाडुंचे क्रिडा कार्यमान अतिशय महत्वाचे आहे.कोणत्याही खेळात शारीरीक सुदृढता गरजेची असते.खेळाडुची शारीरीक सुदृढता सुधारण्यासाठी वेगवेगळया प्रशिक्षण पद्धती वापरल्या जातात.

मैदानी स्पर्धा हया अतिशय प्राचिन काळापासुन व देश विदेशात आवडीने खेळल्या जाणाऱ्या स्पर्धा आहेत.मैदानी स्पर्धा म्हणजे सर्व खेळाचा राजा समजला जातो व मैदानी स्पर्धात प्राविण्या मिळविण्यासाठी खेळाडुंचे व्यक्तीमत्व,आत्मविश्वास व राहत असलेला निवास परिसर कशा प्रकारचा आहे त्यावर त्यांचे यश अवलंबुन असते.

1.3. व्यक्तीमत्वाची व्याख्या :-

1) निर्सगाने आपणस जे काही दिले आहे त्याच्या सह केलेली जिवणाची वाटचाल म्हणजे व्यक्तीमत्व होय- **जे.बी.वॉटसन**

2) व्यक्तीमत्व म्हणजे स्वतःच्या परिसराशी व्यक्तीचे जे वैशिष्टपुर्ण समायोजन होत असते त्याला कारणीभुत असणारी व वर्तनाला चालणा देणारी शारिरीक व मानसिक यंत्रणाची संघटना होय.- **जी.डब्ल्यु.ऑलपोर्ट**

3) व्यक्तीमत्व म्हणजे सामाजिक परिस्थीत घडणाऱ्या व्यक्तीच्या वर्तनाची गोळा बेरीज होय- **ए.ई.ट्रॅक्सलर**

1.4. व्यक्तीमत्व म्हणजे काय :-

व्यक्तीमत्व हे व्यक्तीच्या कोणत्याही एका शारिरीक व मानसिक गुणधर्मात समावलेले नसुन हे संघ स्वरुपी आहे.संघस्वरुपी घटकामध्ये केवळ सुसंगतपणे व सातत्याने दिसुन येणाऱ्या शारिरीक मानसिक सामाजीक गुणधर्माचा समावेश होतो.व्यक्तीचे व्यक्तीमत्व ज्या गुणधर्मावरुन स्पष्ट होते त्या गुणधर्माचा अविष्कार

सामान्यता सामाजीक वर्तनामध्ये दिसुन येत असल्यामुळे व्यक्तीमहत्व या कल्पनेस प्रामुख्याने सामाजीक संदर्भ प्राप्त झाला आहे.कोणत्याही व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचा इतर व्यक्तीवर प्रभाव पडतो हा प्रभाव शरीर रचना तद्वतच वर्तन विशेषातुन पडतो.वर्तनाच्या मुळाशी मानसिक कल ,अभिरुची,अभिवृत्ती , प्रतिक्षमता इत्यादी गोष्टी असतातच म्हणुन व्यक्तीमत्व हे या सर्वांचा संगम होय.

1.5. आत्मविश्वाची व्याख्या :-

1) परिस्थीती संयमाने हातळण्याची व त्यातुन यश किंवा अनुकुलता प्राप्त करण्याची क्षमता म्हणजेच आत्मविश्वास होय.**:-प्रा.प्रभाकर भोरे**

1.6. आत्मविश्वाची म्हणजे काय :-

जगातील सर्व यशाचा पाया हा आत्मविश्वास आहे.आत्मविश्वास शिवाय यश म्हणजे पाण्याशिवाय मासा खेळडुंचा आत्मविश्वास निर्माण झाला की,खेळाडुस खेळण्याची इच्छा होते.आत्मविश्वास निर्माण झाला की,अपयश पळुन जाते. आपल्याला जे साध्य करायचे आहे ते मी करु शकतो असा आत्मविश्वास मनात निर्माण करावा.यशस्वी मानसाच्या जिवनाचा पाया म्हणजे आत्मविश्वास. जेथे आत्मविश्वास आहे तेथे यश,विजय आहे. **:-प्रा.प्रभाकर भोरे**

1.7 संशोधनाची आवश्यकता आणि महत्त्व :-

1) मैदानी स्पर्धा हया अतिशय प्राचीन व विदेशात मोठया प्रमाणावर खेळल्या जातात.भारता मध्ये मैदानी स्पर्धा व चढाओढीचा (ॲथलेटिक्स) जन्म18 व्या शतकातील अखेरच्या दशकात झाल्याचे सांगण्यात येते. सन 1924 साली पहीला राष्ट्रीय मैदानी स्पर्धचे दिल्ली मध्ये आयोजन करण्यात आले होते.सन1934 साली राष्ट्रीय मैदान स्पर्धमध्ये महीला क्रिडा प्रकाराचा समावेश करण्यात आला.तसेच पहीले राज्य मैदानी स्पर्धा

सध्याचे नेहरु स्टेडीअम ज्या जागेवर आहे. त्याठिकाणच्या पुर्वीच्या हिराबाग मैदानावर सन 1950-1951 मध्ये पार पाडली.मैदानी स्पर्धसाठी खेळाडुची विशिष्ट अशी शरिर धारणा असणे आवश्यक आहे.शरिर धारणासाठी नियमीत व्यायाम करण्याची आवश्यकता असते व नियमीत व्यायाम,जिम,योगा,वेगवेगळे प्रशिक्षण घेवुन चांगले व्यक्ती महत्व तयार करुन शकतो त्याच प्रमाणे व्यक्तीचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी त्याची प्रशसा करणे,तारीफ करणे,संघनायक बनवणे,प्राप्त केलेले यश/कामगीरी याची उचित ठिकाणी प्रसिध्दी करणे,क्रिडा मार्गदर्शकाचे व्यक्तीमत्व व आचरण खेळाडुंना प्रेरणा दायक ठरते.त्यामुळे मार्गदर्शकाचे व्यक्तीमत्व व आचरण आदर्श असणे महत्वाचे आहे.खेळाडुचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी त्याचा पोशाख,साधणे,मैदान,साहीत्य चांगल्या प्रतीची असवीत व मैदानाची योग्य आखणी आवश्यक आहे.खेळाडुचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी वेळोवेळी विविध पुरस्कार ,प्रमाणपत्रे,रोखबक्षीसे, वस्तुस्वरुपात पुरस्कार ढाल,कप,खेळाची किट,ट्रॅकसुट,असे त्याला त्याचे आयुष्यात फारच मोलाचे ठरते.

1.8 संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

1) आंतरमहाविद्यालयीन लघु अंतर (100मीटर,200मीटर,400मीटर) धावणे या क्रिडा स्पर्धतील महीला खेळाडुच्या क्रिडा कार्यमानाचे मापन करणे.

2) आंतरमहाविद्यालयीन लघु अंतर (100मीटर,200मीटर,400मीटर) धावणे या क्रिडा स्पर्धतील महीला खेळाडुच्या व्यक्तीमत्वाचे मापन करणे.

3) आंतरमहाविद्यालयीन लघु अंतर (100मीटर,200मीटर,400मीटर) धावणे या क्रिडा स्पर्धतील महीला खेळाडुच्या आत्मविश्वाचे मापन करणे.

4) आंतरमहाविद्यालयीन लघु अंतर (100मीटर,200मीटर,400मीटर) धावणे या क्रिडा स्पर्धतील महीला निवास परिसराचा क्रिडा कार्यमानावर होणाऱ्या परिणाचे मापन करणे.

5) आंतरमहाविद्यालयीन लघु अंतर (100मीटर,200मीटर,400मीटर) धावणे या स्पर्धतील सहभागी महीला खेळाडुच्या क्रिडा कार्यमान याची तुलना करणे.

6) आंतरमहाविद्यालयीन लघु अंतर (100मीटर,200मीटर,400मीटर) धावणे या क्रिडा स्पर्धतील महीला खेळाडुचे व्यक्तीमत्व व आत्मविश्वास यांचा महीला खेळाडुच्या संपादनाची तुलना करणे.

1.9 परिकल्पना :-

1) आंतरमहाविद्यालयीन लघु अंतर (100मीटर,200मीटर,400मीटर) धावणे या क्रिडा स्पर्धतील महीला क्रिडा कार्यमानवर व्यक्तीमत्वाचा सार्थ फरक पडेल.

2) आंतरमहाविद्यालयीन लघु अंतर (100मीटर,200मीटर,400मीटर) धावणे या क्रिडा स्पर्धतील महीला क्रिडा कार्यमानवर आत्मविश्वासाचा सार्थ फरक पडेल.

3) आंतरमहाविद्यालयीन लघु अंतर (100मीटर,200मीटर,400मीटर) धावणे या क्रिडा स्पर्धतील महीला क्रिडा कार्यमानवर निवास परिसराचा सार्थ फरक पडेल.

1.10 संशोधनाची कार्यत्मक व्याख्या:-

प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक लागणाऱ्या संज्ञाच्या कार्यात्मक व्याख्या पुढील प्रमाणे-

1) आंतरमहाविद्यालयीन खेळाडू :

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत एकूण चार जिल्हे असून त्या जिल्ह्यामध्ये आंतरमहाविद्यालयीन मैदानी क्रीडा स्पर्धा होतात. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना आंतरमहाविद्यालयीन खेळाडू असे संबोधण्यात येईल.

2) लघु अंतर धावण्याच्या स्पर्धा :

100मीटर,200मीटर,400मीटर अंतर धावण्याच्या स्पर्धेला लघु अंतर धावण्याचा स्पर्धा असे म्हणतात.तसेच या स्पर्धला जास्त वेगाच्या स्पर्धा (sprints) असेही म्हणतात.

3) व्यक्तीमत्व :-

व्यक्तीमत्व म्हणजे स्वतःच्या परिसराशी व्यक्तीचे जे वैशिष्टपुर्ण समायोजन होत असते त्याला कारणीभुत असणारी व वर्तनाला चालणा देणारी शारिरीक व मानसिक यंत्रणाची संघटना होय.

4) आत्मविश्वास:-

परिस्थीती संयमाने हातळण्याची व त्यातुन यश किंवा अनुकुलता प्राप्त करण्याची क्षमता म्हणजेच आत्मविश्वास होय.

5) क्रिडा कार्यमान :-

खेळाडुने उत्तम क्रिडा कौशल्य,योग्य मनस्थितीची साथ असेल तरच प्रत्यक्ष खेळतांना खेळाडुंना उच्च क्रिडा कार्यमान/यश मिळते.

6) निवास परिसर :

खेळाडूंचे राहते घर व त्या आजूबाजूच्या 1 कि.मी. परिसरास निवास परिसर असे संबोधण्यात येईल.

1.11 संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :-

व्याप्ती :-

अ) संशोधन हे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन लघु अंतर मैदानी स्पर्धेतील सहभागी महीला खेळाडू पुरते मर्यादित आहे. संशोधनाची भौगोलिक व्याप्ती ही नांदेड,लातुर,परभणी,हिंगोली जिल्ह्यापुरती असेल.

ब) संशोधन हे वय 19 ते 25 वर्षे वयोगटातील मुली/महीला पुरते मर्यादित असेल.

क) संशोधन हे लघु अंतर (100मीटर,200मीटर,400मीटर)मैदानी खेळांपुरते मर्यादित असेल.

ड) संशोधन हे आंतरमहाविद्यालयीन लघु अंतर (100मीटर,200मीटर, 400 मीटर) धावणे या स्पर्धतील सहभागी नांदेड,लातुर,परभणी,हिंगोली जिल्ह्या -तील महाविद्यालयीन संघातील समाविष्ट मुली/महीला पुरते मर्यादित असेल.

मर्यादा :-

१) आंतरमहाविद्यालयीन लघु अंतर स्पर्धातील वय वर्षे 19 पेक्षा कमी व वयवर्षे 25 पेक्षा जास्त वयाच्या गटाचा विचार केला जाणार नाही.

२) आंतरमहाविद्यालयीन लघु अंतर स्पर्धातील नांदेड,लातुर,परभणी,हिंगोली या चार जिल्हयाच्या बाहेरच्या जिल्हाचा विचार केला जाणर नाही.

३) आंतरमहाविद्यालयीन लघु अंतर स्पर्धात व्यक्तीमत्व,आत्मविश्‍वास व निवास परिसराच्या बाहेरच्या घटकाचा विचार केला जाणार नाही.

४) आंतरमहाविद्यालयीन लघु अंतर स्पर्धेत 100 मिटर,200मिटर, 400मिटर या तीन घटकाच्या बाहेरच्या घटकाचा विचार केला जाणार नाही.

प्रकरण 2 रे

2.1 संदर्भीत पूर्व संशोधनाचा आढावा :-

सदर आभ्यासाच्या संदर्भाने उपयुक्त असे साहीत्य विविध ग्रंथालयातुन हाताळणे गरजेचे असते याची जाणीव शोधकर्त्यांस असल्यामुळे सदर साहीत्य जेथे-जेथे उपलब्ध होईल त्या ठिकाणापासुन उपलब्ध केले जाईल.त्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यपीठ नांदेड च्या ग्रंथालयाला प्रामुख्याने भेट देवुन तेथील उपलब्ध साहीत्याचा अभ्यास करुन मनन,चिंतन केल्या जाईल .अभ्यासाच्या दृष्टीने सखोल चर्चा करण्यात येइल.अशा प्रकारे साहीत्य नांदेड व मराठवाडा विभागातील अद्यावत व नामांकित ग्रंथालयतील साहीत्य सदर संशोधनाकरिता महत प्रयत्नाने उपलब्ध करण्यात येईल.ज्यामुळे सदर संशोधनाची एक निश्चित दिशा ठरविण्यात मदत येईल.

संशोधन समस्येची निवड करण्यासाठी सखोल दृष्टी व स्पष्ट समज संबंधित संदर्भ साहित्याच्या अभ्यासाने संशोधिकेस मिळते. विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमता, मानसिक क्षमता, सर्जनशीलता, कार्यक्षमता व अध्ययन क्षमता यावर अनेक प्रकारचे संशोधन झालेले आहेत. परंतु मैदानी खेळामध्ये व्यक्तीमत्व,आत्मविश्वास व निवास परिसर यावर संशोधन कमी आढळून आले आहे. संशोधिकेने संशोधन विषया संदर्भातील काही संशोधनाचा आढावा घेतला आहे याचा सारांश पुढील प्रमाणे.

1.नेल्सन (1962) : "तुसीयांना तेथील पब्लिक स्कूल या शाळांतील शारीरिक शिक्षण शिक्षणाचे मूल्यमापन " या विषयावर संशोधन करण्यासाठी नेल्सन यांनी

सर्वेक्षण केले होते. त्यांनी आपल्या वर्ग तसेच मोठे, खेळ, आंतरशालेय ॲथलेटिक्स, आरोग्य शिक्षण सुविधा, साधने व साहित्य आर्थिक सहाय्य तसेच सामाजिक साधनांची उपलब्धता या विषयी फारच उपयुक्त अशी माहिती मिळते. त्यांनी कॅलिफोर्नियातील 49 माध्यमिक शाळांमध्ये आपले सर्वेक्षण केले. आपल्या सर्वेक्षणासाठी त्यांनी प्रश्नावलीचा उपयोग केला. त्या शाळांमध्ये शारीरिक शिक्षण अभ्यासक्रम राबविण्यासाठी कोणत्या प्रकारचे धोरण लागू केले होते या विषयी त्यांनी अभ्यास केला होता. कॅलिफोर्निया देशाचे शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमाविषयी जे धोरण होते त्या धोरणानुसार त्या शाळांतील मुले 4 वर्षासाठीच्या शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमात योग्य अशा स्तरापर्यंत पोहचू शकले नाहीत.

2.तिवारी (1977) : "तिवारी यांनी माध्यमिक शाळेतील मुले व मुलींच्या व्यक्तिमत्वाचा तुलनात्मक अभ्यास " शहरी व ग्रामीण भागातील मुले व मुलींच्या व्यक्तिमत्वातील विविध गुण वैशिष्ट्यांच्या माध्यमांचा अभ्यास करणे, तंत्राचा उपयोग करून माध्यम तंत्राची क्षेत्र व लिंगाच्या दृष्टीने तुलना करणे, तंत्राद्वारे लिंग, क्षेत्र, आणि व्यक्तिमत्व गुणवैशिष्ट्यांवर होणाऱ्या आंतरक्रियेचा परिणाम अभ्यासणे हे संशोधकाचे प्रमुख उद्देश होते. ह्यासाठी संशोधकाने शहरी इयत्ता 10 वी च्या 200 मुली व 300 मुले आणि ग्रामीण भागातून इयत्ता 10 वीच्या 200 मुली व 300 मुले संशोधनासाठी निवडले. एकूण 1000 विद्यार्थ्यांनी नमुना म्हणून

निवडले. बुद्धिमत्ता, समाजशीलता आणि समायोजना क्षमता या व्यक्तिमत्व गुणांचे मापन करण्यांत आले त्यात सामान्य मानसिक क्षमता चाचणी व्यक्तिमत्व शोधिका, तुलनात्मक पद्धती प्रश्नावलीचा वापर केला.

3.गिरगावंकर (1989) : "मराठवाड्यातील शहरी व ग्रामीण माध्यमिक विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाचा बीड जिल्ह्याच्या संदर्भातील तुलनात्मक अभ्यास ", हे संशोधनाचा प्रमुख उद्देश होता.

शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाच्या शारीरिक घटकांचा आढावा घेणे, शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वातील आत्मविश्वास, समाजशिलता, अतिसंवेदनशिलता व स्वयंपूर्णतः या घटकांचा आढावा घेणे. शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वातील बौद्धिक समतांचा तुलनात्मक अभ्यास करणे. शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्वातील विविध घटकांचा, क्षमतांचा तुलनात्मक अभ्यास करून उपाययोजना सुचविलेल्या. ग्रामीण विद्यार्थ्यांना शहरी विद्यार्थ्यांच्या तुलनेत शारीरिक घटकांच्या विकासासाठी योग्य वातावरण मिळाल्याने प्रमाणित वजन उंचीनुसार असणाऱ्या ग्रामीण विद्यार्थ्यांची संख्या अधिक आहे.

शहरी विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास ग्रामीण विद्यार्थ्यांच्या तुलनेत अधिक आहे. ग्रामीण विद्यार्थी शहरी विद्यार्थ्यांच्या तुलनेत अधिक अतिसंवेदनशिल आहेत. शहरी व ग्रामीण विद्यार्थ्यांच्या स्वयंपूर्णतेच्या बाबतीत फरक दिसून येत नाही.

4. वसंत पाटील (2006) :

"डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धात महिला खेळाडूंच्या अल्प सहभागावर परिणाम करणाऱ्या सामाजिक, आर्थिक व मानसिक घटकांचा एक चिकित्सक अभ्यास ", अप्रकाशित पीएच. डी. शोधप्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे सादर केला होता. त्यात पुढील उद्दिष्टये व निष्कर्ष काढण्यात आले.

प्रकरण 3 रे

3.1 संशोधन पद्धती :-

सदर संशोधनात वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला जाईल.

3.2 जनसंख्या :-

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड अंतर्गत नांदेड,लातुर,हिंगोली,परभणी जिल्हा लघु आंतर (100मीटर,200मीटर,400मीटर) धावण्याच्या मैदानी स्पर्धेत शैक्षणिक **वर्षे 2019-20 व 2020-21** मधील एकूण नांदेड,परभणी,लातुर,हिंगोंली चारही जिल्हयातील सहभागी मुली आहेत.

3.3 न्यादर्श :-

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत नांदेड,परभणी,हिंगोली,लातुर जिल्हा आंतरमहाविद्यालीयन लघु अंतर (100मीटर,200मीटर,400मीटर) धावण्याच्या मैदानी स्पर्धेतील प्रत्येक प्रकाराच्या 15-15 मुली या प्रमाणे चारही जिल्हयाच्या एकुण 180 शैक्षणिक वर्षे 2019-20 व 2020-21 मध्ये एकूण सहभागी मुली 360 आहेत.त्यांची सुगम यादृच्छिक पद्धतीने निवड करण्यात येईल.

3.4 संशोधनाची साधने :-

सदरील अभ्यासामध्ये माहिती गोळा करण्याचे साधन म्हणून प्रश्नावली, व आत्मविश्वासाची प्रमाणीत मानस शास्त्रीय चाचणी वापरण्यात येईल व व्यक्तमत्वाची प्रमाणित मानस शास्त्रीय चाचणी वापरण्यात येईल. प्राविण्य मापिका

याचा वापर करण्यात येईल. खेळाडूंच्या निवास परिसर माहितीसाठी मार्गदर्शक व तज्ज्ञांबरोबर चर्चा करून एक प्रश्नावली तयार करण्यात येईल. यामध्ये निवास परिसराची भौगोलिक स्थिती, निवास परिसरातील लोकांची आर्थिक परिस्थिती, सामाजिक परिस्थिती, परिसरातील फौजदारी गुन्ह्यांचे प्रमाण याबाबत माहिती प्रश्नावली तयार करण्यात येईल. सदर प्रश्नावलीची वैधता, वस्तुनिष्ठता तपासण्यात येईल. ही तपासणी समाधानकारक आल्यामुळे याचा वापर संशोधन साहित्य म्हणून करण्यात येईल.

3.5 कार्यपद्धती :-

सदरील अभ्यास हा सर्वेक्षण पद्धतीचा असल्याने चार जिल्हयातील स्पर्धच्या ठिकाणी सन 2019-20 व्यक्तमत्व व आत्मविश्वास यांची प्रमाणीत मानस शास्त्रीय चाचणी व निवास परिसराची प्रश्नावली संशोधिका स्वत: जावुन महीला खेळाडु कडुन भरुन घेतील.

1) पथदर्शक अभ्यास

निवास परिसर या चलाच्या संशोधन साधणासाठी प्रश्नावली संशोधन साधन वापरण्यात येईल या संशोधन साधनाचा पथदर्श अभ्यास 25 महीला खेळाडुवर करण्यात येईल.

3.6 सांख्यिकी साधने :-

प्रस्तुत संशोधनातील माहीती विश्लेषनासाठी टि-परिक्षीका,सहसंबध या सांख्यिकी परिणामाचा वापर करुन परिकल्पनाची उकलन करुन निष्कर्ष प्रस्थापित करण्यात येतील.

प्रकरण 4थे

प्रस्तुत संशोधानासाठी संशोधकांनी प्राप्त माहीती व माहीतीचे संकलन,वर्गीकरण व अर्थ निर्वचन करण्यात येईल.ज्यामुळे संशोधनाच्या उद्दिष्टांकडे जाणे सोपे होईल,प्राप्त माहीतीच्या आधारे उद्दिष्टांचा अर्थनिवर्चन व निष्कर्ष स्पष्ट करण्यात येईल.संशोधन अभ्यास करण्यासाठी टि-परिक्षीका,सहसंबध या सांख्यिकी परिणामाचा वापर करुन परिकल्पनाची उकलन करुन निष्कर्ष प्रस्थापित करण्यात येतील.

प्रकरण 5 वे

सारांश,निष्कर्ष व शिफारशी

सारांश,निष्कार्ष व शिफारशी या प्रकरणात संशोधनकर्त्याने हो शोध प्रंबध पुर्ण करण्या करीता प्रकरण 1 ते 4 मध्ये केलेल्या व मांडलेल्या बाबीचा आढावा संक्षिप्त स्वरुपात या उद्घोषित करण्यांत येईल.त्याच बरोबर 4 मधुन जे पुढे आलेले निष्कर्ष व अनुषंगाने प्रकरण 1 मध्ये केली गेलेली परिकल्पना त्याच्याशी पडताळुन पाहण्यात येईल.त्याचा उल्लेख या प्रकरणातुन केला जाईल.शिवाय या शोध प्रबंधाला अनुसरुन संशोधन कार्य करीत असतांना आढळुन आलेल्या गोष्टी , सुचना व शिफारशीच्या माध्यमातुन मांडण्यात येतील.

संदर्भ सूची

- **आगलावे प्रदीप,** संशोधन पद्धती शास्त्र व तंत्र
- **कदम चा.प. (1987),** शैक्षणिक संख्याशास्त्र, पुणे, नूतन प्रकाशन
- **जर्दे श्री.आ., (1995),** शारीरिक शिक्षण संशोधन तंत्र व पद्धती, कोल्हापूर, चंद्रमा प्रकाशन
- **नाडकर्णी सुरेशचंद्र, (1999),** क्रीडा ज्ञानकोश, पुणे, मेहता पब्लिकेशन
- **पाटील वा.भा., (2006),** संशोधन पद्धती, पुणे, प्रशांत पब्लिकेशन्स
- **भिंताडे वि.रा., (1989),** शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे, नूतन प्रकाशन
- **मुळे रा.श., उमाठे वि.तू., (1987)**, शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे, नागपूर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ
- **यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक (1992),** संशोधन मार्गदर्शक मालिका, पृ.1 ते 15.

- **सांगलीकर व्ही.एन.**, व्हॉलीबॉल - नियम व कौशल्य, कोल्हापूर, अंबा प्रकाशन
- **गिरवलकर एस.एस. (2005),** मराठवाड्यातील आठ जिल्ह्यातील खो-खो या खेळातील खेळाडूंना (मुले व मुली) येणाज्या अडचणींचा तुलनात्मक अभ्यास, अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
- **प्रा.शंकर तिवाडी :-** शारिरीक शिक्षण मापन व मुल्यमापन.
- **डॉ.एच.ए.मोन :-** शैक्षणिक व शारिरीक शिक्षण संशोधन,विजय प्रकाशन नांदेड 2006
- **प्रा.सौ.माधवी कवि :-** 101 महिला,विद्याभारती प्रकाशन.
- **प्रा.प्रभाकर भोरे :-** मी यशस्वी होणारच व्यक्तीमत्व विकास,सांकेत प्रकाशन.
- **प्रा.डॉ.प.म.आलेगांवकर:-** प्रगत क्रिडा मानसशास्त्र.
- **प्रा.के.एन.गंदगे व प्रा.उत्तम अ.धुमाळ :-** शारिरीक शिक्षणशास्त्र.
- **आ.पा.खरात :-** शर्यती - स्पर्धा -खेळ

संशोधक	**मार्गदर्शक**
लोपामुद्रा दत्तराव आनेराव	**डॉ. अश्विन बोरीकर,** क्रिडा विभाग प्रमुख,सायन्स कॉलेज नांदेड